RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ७, अंक २३] मंगळवार, फेब्रुवारी २३, २०२१/फाल्गुन ४, शके १९४२ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ फेब्रुवारी २०२१

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस ०९२०/प्र.क्र.१०७/राऊशु-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धीशिवाय हे नियम करण्यात यावेत. असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (१) व पोट-कलम (२) च्या खंड (g) आणि (h१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना " महाराष्ट्र देशी मद्य नियम (सुधारणा) नियम, २०२१ " असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ च्या नियम २५ मधील खंड (d) च्या उप-खंड (iv) मध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या परंतुकाऐवजी पुढील परंतुक समाविष्ट करण्यात यावे. जसे की,

" परंतु असे की, अशी अनुज्ञप्ती अशा जागेवरती स्थालांतरीत करता येतील ज्या प्रस्तावित जागेपासून २०० मीटर हवाई अंतरात दुसरी तत्सम अनुज्ञप्ती स्थित नसेल. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 23rd February 2021

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No MIS-0920/C.R. 107/Excise-3.—Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules furhter to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973, should be brought into force at once and therefore the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (*b*), (*g*) and (*h1*) of sub-section (*2*) read with proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973, as follows, namely :—

1. These rules may be called Maharashtra Country Liquor (Amendment) Rules, 2021.

2. In the rule 25 of the Maharashtra Country Liquor Rules, 1973 in clause (*d*), in sub-clasue (*iv*), for the existing proviso, the following proviso shall be substituted, namely :—

> " Provided that, the licensed shop shall be shifted to the premises where no shop with similar license is situated within the aerial distance of 200 meters from the proposed premises."

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग, फेब्रुवारी २३, २०२१/फाल्गून ४, शके १९४२महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग, फेब्रुवारी २३, २०२१/फाल्गून ४, शके १९४२

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.